कांडवेल

***Cissus quadrangularis*** L.    Family – **Vitaceae**




**विविध भाषांमधील नावे:**
संस्कृत : अस्थिसंहार, अस्थिभंग, कांडलता, वज्रवल्ली; मराठी: कांडवेल, घोणसकांडे, कन्नड: संदुबाळली; तामिळ: अरुकल्ली; मल्याळम: चांगलामपरंडा; इंग्लिश: बोन सेटर; हिंदी: हाडजोड

**Morphology:**
Extensive climbers, with aerial roots; stem leafless when old; stem angled. Leaves broadly ovate, apex rounded. Flowers in shortly peduncled, umbellate, axillary cymes. Petals greenish white. Disk 4-lobed. Berries apiculate, 1-2-seeded.

**वनस्पतीचे वर्णन:**
कांडवेल ही सर्व उष्ण प्रदेशांमधील देशांमध्ये आढळते. जसे की आफ्रिका, जावा, श्रीलंका, भारत इत्यादी. या देशांमध्ये ही वनस्पती वन्यस्थितीमध्ये ही आढळून येते. चार धारा असलेली व पेरांजवळ संकुचित झालेली अशी ही वेल दुसऱ्या झाड्याच्या आधाराने वाढते. प्रत्येक कांडे मांसल, पाणीदार असते. पाने ह्रिदयाकृती, छोटी असतात. प्रत्येक पानाच्या विरुद्ध बाजूस लतातंतू असतात. फुले छोटी, हिरवट, गुच्छामध्ये येतात. फळे छोटी, गोलाकार, लालसर रंगाची असून त्यात एकाच बी असते.

**बहर येण्याचा कालावधी :** मार्च ते जून या काळात

**औषधी उपयोग:**
अस्थिभंगावरील रामबाण उपाय म्हणून या वनस्पतीचा वापर केला जातो. स्त्रियांचे आजार, दमा, कर्णशूल इ. रोगांवरही ह्या वेलीचा वापर केला जातो. या वेलीच्या कांड्यांचा वस्त्रगाळ रस काढून तो प्राशन केला जातो.

**लागवड:**
या वनस्पतीची लागवड २ पेरे असणारी कांडे वापरून केला जातो. कांड्याना लवकर मुळे फुटण्यासाठी ते शेणामध्ये एक दिवस बुडवून ठेवली जातात. प्रत्येक कांडे ५ फूट अंतरावरती लावले जाते. या वनस्पती ला सूर्यप्रकाशाची गरज असते तसेच कमी पाण्यामध्ये याची वाढ चांगली होते. या वनस्पतीच्या सभोवताली जास्त पाणी राहणार नाही याची काळजी घ्यावी.